# संकल्पना



महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणारा 'करिअर कट्टा' हा उपक्रम. या उपक्रमांतर्गत राज्यातील महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून राबवल्या जाणाऱ्या सर्व उपक्रमांची माहिती सर्व स्टेक होल्डरपर्यंत पोहोचावी या उद्देशाने या माहिती पुस्तिकेची निर्मिती केलेली आहे.

राज्यामध्ये १०० सेंटर ऑफ एक्सलन्स प्रस्तावित असताना पैकी ६० सेंटर्स कार्यान्वित झाले असून उर्वरित ४० सेंटर्स शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये कार्यान्वित होतील. १०० पैकी ५० पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र अत्यंत चांगल्या पद्धतीने कार्यान्वित झालेली आहेत. करिअर कट्टाअंतर्गत १० स्टेट रिसोर्स सेंटरच्या माध्यमातून तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन राज्यातील विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार क्षेत्रनिहाय देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. मॉडेल स्किल डेव्हलपमेंटच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या विविध योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविल्या आहेत. ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती यांच्या सहकार्याने राज्यातील प्रत्येक तालुक्यातील विद्यार्थ्यांमधून कृषी क्षेत्रामधील उद्योग किंवा व्यवसायामध्ये आवड असणाऱ्या तरुणांना विशेष प्रशिक्षण देऊन १५०० हून अधिक उद्योजक या माध्यमातून निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

राज्यामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत मधुमक्षिका पालनाच्या विषयाला जे महत्त्व विद्यापीठ स्तरावर देण्यात आलेले आहे आणि दोन क्रेडिटचे कोर्स अनेक विद्यापीठांनी तयार केलेले आहेत या कोर्सला पूरक प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक असणारी यंत्रणा 'मधुर क्रांती' या उपक्रमांतर्गत केली जाणार आहे. राज्यामध्ये शंभरहून अधिक महाविद्यालयांमध्ये शास्त्रशुद्ध पद्धतीचे चार चाकी वाहन प्रशिक्षण देण्याची यंत्रणा उभी केली जात आहे. तसेच महाविद्यालयीन तरुण-तरुणींना छोट्या व्यवसायासाठी संधी मिळावी या उद्देशाने 'बिजनेस व्हॅन' देखील उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

'गर्जे मराठी ग्लोबल' सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या माध्यमातून १०० हून अधिक देशातील १५000 पेक्षा जास्त मराठी उद्योजकांचा आणि विद्यार्थ्यांचा समन्वय संवाद सातत्यपूर्णरित्या घडवून आणला जात आहे. या माध्यमातून आंतरराष्ट्रीय पातळीवर असणाऱ्या व्यवसायाच्या आणि नोकरीच्या संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जातील. यासाठी आवश्यक असणारे स्टार्टअप साठीचे तज्ञ मार्गदर्शक देखील करिअर कट्टाच्या व्यासपीठावर विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. करिअर संसदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या नेतृत्व विकासाला चालना देत असतानाच त्यांच्यामधील क्षमतांचा योग्य विकास व्हावा आणि त्यांना योग्य वेळात योग्य त्या संधी उपलब्ध व्हाव्यात या दृष्टिकोनातून विशेष प्रयत्न केले जात आहेत.

यासाठी संपूर्ण राज्यामध्ये जिल्हास्तरीय करिअर संसद नियोजन समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. प्रत्येक महाविद्यालयामध्ये दोन समन्वयक करिअर कट्टा उपक्रमासाठी नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा समन्वयक व प्राचार्य प्रवर्तक हे देखील हा उपक्रम जास्तीत जास्त सक्षमपणे राबवण्यासाठी कार्यरत आहेत.

# संकल्पना

पुढील पाच वर्षांमध्ये १२ लाख पेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम साधनाच्या उद्देशाने एक कृती आराखडा घेऊन करिअर कट्टा उपक्रम मार्गक्रमण करत आहे. यामध्ये राज्यस्तरीय सल्लागार मंडळाची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची आहे. सल्लागार मंडळाने दिलेले मार्गदर्शन आणि प्राचार्य प्रवर्तक, जिल्हा समन्वयक, महाविद्यालयीन समन्वयक व करिअर संसद जिल्हा नियोजन समिती यांची कृती या अनोख्या समन्वयातून युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी करिअर कट्टा हा उपक्रम कार्यरत आहे. राज्यस्तरीय संपादकीय मंडळांनी ही माहिती पुस्तिका अत्यंत चांगली तयार व्हावी यासाठी मेहनत घेतलेली आहे. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो!

हे सर्व उपक्रम राबिण्यासाठी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण संचालक व सहसंचालक यांनी देखील खंबीर असे पाठबळ दिलेले आहे त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार!

जय हिंद, जय महाराष्ट्र !

यशवंत

मा. यशवंत शितोळे
अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती
तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र